# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.241,दि.02.03.2022
**{समाज वि.विभाग}** नागपूर महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत दिव्यांग बांधवांकरिता विविध योजना राबविण्यात येत आहे. योजना राबवितांना योजनेंतर्गत अटी व शर्ती निर्गमित करण्यात आले आहेत व प्रस्तावित अटी व शर्ती नुसार सर्व घटक योजनांची अंमलबजावणी सुरु आहे. तथापी, योजनेची अंमलबजावणी करीत असतांना मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.241,दि.02.03.2022 अन्वये विभागाचे योजनेंतर्गत एकदा लाभ दिलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना दुबार लाभ देण्यात येणार नाही असे प्रस्तावित आहे. परंतू किती कालावधीनंतर दुबार लाभ देता येईल याबाबत नमूद नाही.त्यामुळे योजनेची अंमलबजावणी करीत असतांना दिव्यांग लाभार्थ्यांनी एका योजनेचा लाभ घेतले असल्यास त्यांनी दुसऱ्या योजनेंतर्गत अर्ज केल्यास त्यांना लाभ देतांना अडचणी निर्माण होत आहे. दिव्यांग लाभार्थ्यांना दुबार लाभ देण्याबाबत शासनाचे दिशानिर्देश प्राप्त नाही.

हि बाब लक्षात घेता,योजनेची अंमलबजावणी करतांना अधिक सुसूत्रता व पारदर्शकता राहावी याकरिता पुढीलप्रमाणे दुबार लाभ घेण्याबाबत कार्यप्रणाली प्रस्तावित करण्यात येत आहे

१. दिव्यांग अर्जदाराने एखाद्या Category of Scheme चा लाभ (उदा.उदरनिर्वाहासाठीच्या योजना) एकदा घेतल्यानंतर त्या Category of Scheme चा लाभ दुबार देता येणार नाही.
   उदा.- ई रिक्षा हे उपजिविकेसाठी देण्यात आलेला लाभ आहे अशा लाभार्थ्यांना उदरनिर्वाहासाठीच्या इतर कोणत्याही योजनेचा (महापालिकेच्या) दुबार लाभ देता येणार नाही.
२. इतर कोणत्याही योजनेसाठी सदर लाभार्थी पात्र असल्यास त्या वर्षीच्या नवीन अर्जानुसार (Fresh Applications) किंवा मागील वर्षातील चालू प्रतीक्षा यादीनुसार अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार आवश्यक पात्र लाभार्थी उपलब्ध न झाल्यास संबंधितास तशा इतर योजनेचा लाभ देता येईल. पात्र दिव्यांग लाभार्थ्यास वर नमूद केलेल्या अटीच्या अधीन राहून महापालिकेच्या दिव्यांग आराखड्यातील कोणत्याही एकच योजनेचा लाभ एका आर्थिक वर्षात घेता येईल.
३. काही योजना या Saturation तत्वावर असल्यास व त्या योजनेतदेखील सदर लाभार्थी पात्र असल्यास त्यांना त्याचा लाभ देण्यात येईल.

वरीलप्रमाणे प्रस्तावित नुसार दुबार लाभ घेण्याऱ्या दिव्यांग लाभार्थ्याकरिता धोरण निश्चित करून कार्यप्रणालीस मान्यता प्रदान करणेचा प्रश्न विचारात घेणेबाबत.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 03/**मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 11/04/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (स.वि.वि.), समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.241,दि.02.03.2022

नागपूर महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत दिव्यांग बांधवांकरिता विविध योजना राबविण्यात येत आहे. योजना राबवितांना योजनेंतर्गत अटी व शर्ती निर्गमित करण्यात आले आहेत व प्रस्तावित अटी व शर्ती नुसार सर्व घटक योजनांची अंमलबजावणी सुरु आहे. तथापी, योजनेची अंमलबजावणी करीत असतांना मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्र.241,दि.02.03.2022 अन्वये विभागाचे योजनेंतर्गत एकदा लाभ दिलेल्या दिव्यांग लाभार्थ्यांना दुबार लाभ देण्यात येणार नाही असे प्रस्तावित आहे. परंतू किती कालावधीनंतर दुबार लाभ देता येईल याबाबत नमूद नाही.त्यामुळे योजनेची अंमलबजावणी करीत असतांना दिव्यांग लाभार्थ्यांनी एका योजनेचा लाभ घेतले असल्यास त्यांनी दुसऱ्या योजनेंतर्गत अर्ज केल्यास त्यांना लाभ देतांना अडचणी निर्माण होत आहे. दिव्यांग लाभार्थ्यांना दुबार लाभ देण्याबाबत शासनाचे दिशानिर्देश प्राप्त नाही.

हि बाब लक्षात घेता,योजनेची अंमलबजावणी करतांना अधिक सुसूत्रता व पारदर्शकता राहावी याकरिता पुढीलप्रमाणे दुबार लाभ घेण्याबाबत कार्यप्रणाली प्रस्तावित करण्यात येत आहे .

१. दिव्यांग अर्जदाराने एखाद्या Category of Scheme चा लाभ (उदा.उदरनिर्वाहासाठीच्या योजना) एकदा घेतल्यानंतर त्या Category of Scheme चा लाभ दुबार देता येणार नाही.
   उदा.- ई रिक्षा हे उपजिविकेसाठी देण्यात आलेला लाभ आहे अशा लाभार्थ्यांना उदरनिर्वाहासाठीच्या इतर कोणत्याही योजनेचा (महापालिकेच्या) दुबार लाभ देता येणार नाही.
२. इतर कोणत्याही योजनेसाठी सदर लाभार्थी पात्र असल्यास त्या वर्षीच्या नवीन अर्जानुसार (Fresh Applications) किंवा मागील वर्षातील चालू प्रतीक्षा यादीनुसार अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार आवश्यक पात्र लाभार्थी उपलब्ध न झाल्यास संबंधितास तशा इतर योजनेचा लाभ देता येईल. पात्र दिव्यांग लाभार्थ्यास वर नमूद केलेल्या अटीच्या अधीन राहून महापालिकेच्या दिव्यांग आराखड्यातील कोणत्याही एकच योजनेचा लाभ एका आर्थिक वर्षात घेता येईल.
३. काही योजना या Saturation तत्वावर असल्यास व त्या योजनेतदेखील सदर लाभार्थी पात्र असल्यास त्यांना त्याचा लाभ देण्यात येईल.

वरीलप्रमाणे प्रस्तावित नुसार दुबार लाभ घेण्याऱ्या दिव्यांग लाभार्थ्यांकरिता धोरण निश्चित करून कार्यप्रणालीस मंजुरी देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मान्यता प्रदान केली.